सायबर सेल, पिंपरी चिंचवड
**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०**

**प्रेसनोट पिंपरी चिंचवड दिनांक - /०३/२०२४**

## शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवणुक करुन जास्तीत जास्त पैसे मिळुन देण्याच्या आरोपीचे धागेदोरे बँकॉक पर्यंत

IBKR, Cresset Acadamy, Goldman Sachs या व्हॅटसअप ग्रुपचा वापर करुन फिर्यादी यांचे कोटयावधी रुपयाची फसवणुक करत असल्याने IBKR **Securities**, Cresset Acadamy, Goldman Sachs या कंपनीविरुध्द एकुण १०६९५७५/- रु आर्थिक फसवणुक केलेबाबत तक्रारदार यांनी वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३०६/२०२४ भा.द.वि. कलम ४१९, ४२० आय.टी. ॲक्ट ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदरचा गुन्हयाची व्याप्ती खुप मोठया प्रमाणावर असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी सदरचा गुन्हा पोलीस निरीक्षक, सायबर सेल, गुन्हे शाखा यांच्याकडे वर्ग करण्याचे आदेशित केले होते. सदर गुन्हयात आतापर्यंत ०४ आरोपी अटक करण्यात आले आहेत.

सदर गुन्हयाचा अधिक तपास केला असता यातील आरोपी हे फसवणुकीच्या पैश्यातुन गुजरात येथिल सोनाराच्या दुकानातुन सोने घरेदी करत असल्याची माहीती **सायबर सेलचे सहायक पोलीस निरीक्षक प्रविण स्वामी** यांना माहिती मिळाली होती. सदर माहीतीच्या अनुषंगाने व फिर्यादी यांनी आरोपीच्या अकाऊंटला भरलेल्या पैसे यांचे तांत्रिक विश्लेषण करुन गुजरात येथुन आरोपी नामे अमित जगदिशचंद्र सोनी यास ताब्यात घेण्यात आले होते. त्याच्याकडे अधिक तपास केला असता त्याने सांगीतले की तो सोन्याचे व्यापारी यांच्याकडुन सोने घेऊन त्याचे कॅश मध्ये रुपांतर करुन अहमद नजीर गाझी याला देत होता. अहमद नजीर गाझी हा ती कॅश मुफ्दल व त्याचा भाऊ नामे आबिद याला यु.एस.डी.टी. मध्ये क्रिप्टोकरन्सी खरेदी करुन पाठवत आसे. आरोपी अहमद याचा सख्खा भाऊ आबिद व मुफ्दल हा बँकॉक मध्ये राहुन तेथिल आंतराष्ट्रीय गुन्हेगारी टोळीसोबत काम करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.सदर आरोपीने अद्यापर्यंत ६ अकाऊंटमधील पैसे काढुन कॅश त्याचे यु.एस.डी.टी मध्ये बँकॉक ला पाठविल्याचे दिसुन येत आहे. **आरोपीच्या एकुण ६ अकाऊंटविरुध्द भारतामध्ये एकुण १७७ तक्रारी अर्ज प्राप्त झाले असुन १०० कोटीपेक्षा जास्त रकमेची फसवणुक झालेली आहे.**

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि वैभव शिंगारे, सपोनि सागर पानमंद, सपोनि प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमन, पोशि २५६३ अतुल लोखंडे, पोशि २५६२ बिचेवार पोशि २३०० कृष्णा गवळी, पोशि ३५३६ रजनिश तारु (सर्व नेमणुक सायबर सेल) यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.